३८

## MAHARASHTRA ACT No. VI OF 1967

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल याची संमती दिनांक १५ एप्रिल १९६७ रोजी मिळालेली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. VI OF 1967

AN ACT TO VALIDATE THE APPOINTMENT OF POLICE-PATELS, BY CERTAIN MAGISTRATES NOT BEING DISTRICT MAGISTRATE, AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH.

## सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६

[राज्यपाल याची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात" दिनांक १७ एप्रिल १९६७ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

**जिल्हा दंडाधिकारी नसलेल्या विवक्षित दंडाधिकाऱ्यांनी केलेल्या पोलीस-पाटलांच्या नियुक्त्या विधीग्राह्य करण्यासाठी व तत्संबंधित बाबींसाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, मुंबईच्या उच्च न्यायालयाने, विवक्षित बाबतीत, मुंबई ग्राम-पोलीस अधिनियम, १८६७ (ज्या अन्वये, जिल्हा दंडाधिकाऱ्याकडून, ग्राम पोलीस प्रशासनाचे नियंत्रण व निदेशन याबाबत, वापर करण्यात येणाऱ्या शक्ती, आयुक्तास देण्यात आल्या आहेत आणि ज्या अन्वये अशा दंडाधिकाऱ्यास, आपल्या शक्तीचा कोणताही भाग दुसऱ्या दंडाधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करण्याची शक्ती देण्यात आली आहे) याच्या कलम ३ अन्वये, जिल्ह्याच्या अशा दंडाधिकाऱ्यास आपल्या दुय्यम दंडाधिकाऱ्याला, पोलीस-पाटलांच्या नियुक्त्या आणि त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही याबाबतच्या शक्ती प्रत्यायोजित करण्याचा प्राधिकार देण्यात आलेला नाही आणि म्हणून कलम ९ खालील, पोलीस-पाटलांच्या नियुक्त्या आणि पोलीस-पाटलांच्या विरुद्ध केली जाणारी शिस्तभंगाची कार्यवाही याबाबतच्या जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या शक्तीचे उप-विभागीय दंडाधिकाऱ्याकडे केल्याचे अभिप्रेत असलेले प्रत्यायोजन अनधिकृत व परिणामशून्य आहे, असा निर्णय दिलेला आहे ;

३८

आणि ज्याअर्थी, पोलीस पाटलांची नियुक्ती करण्यासाठी अणि त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासाठी, उप-विभागीय दंडाधिकाऱ्यांना शक्ती प्रत्यायोजित करण्याकरिता [आणि अशा उप-विभागीय दंडाधिकाऱ्यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कलम ३ खाली त्यांना ज्या शक्ती प्रत्यायोजित केल्याचे अभिप्रेत होते अशा शक्तींअन्वये अगोदरच केलेल्या नियुक्त्या व केलेली शिस्तभंगाची कोणतीही कार्यवाही विधीग्राहय करण्याकरिता जिल्हयाच्या दंडाधिकाऱ्यास शक्ती देणे आवश्यक आहे आणि त्या संबंधातील बाबीसाठी तरतूद करणेदेखील आवश्यक आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अठराव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास मुंबई ग्राम-पोलीस (उप-विभागीय दंडाधिकाऱ्यांनी केलेल्या नियुक्त्या व शिस्तभंगाची कार्यवाही विधीग्राहय करणे) अधिनियम, १९६७ असे म्हणता येईल.

(२) तो दिनांक २५ जानेवारी १९६७ रोजी अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १८६७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३ ची सुधारणा.

२. मुंबई ग्राम-पोलीस अधिनियम, १८६७ यांच्या कलम ३ मध्ये "कमिशनरच्या नियंत्रणाखाली" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "सोपवून देण्याचा अधिकार असेल" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो नेहमीकरिता दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल :—

"राज्य शासनाच्या व आयुक्ताच्या नियंत्रणाखाली व निदेशनाखाली जिल्हयाच्या फौजदारी न्यायाधीशाकडून पार पाडण्यात येईल ; अशा फौजदार न्यायाधीशास, या अधिनियमाच्या उपबंधाद्वारे किंवा तदन्वये त्यास प्रदान केलेल्या किंवा वापरण्यायोग्य सर्व किंवा कोणत्याही शक्ती, राज्य शासनाच्या किंवा कमिशनरच्या मंजुरीने, सोपविता येतील, आणि या शक्तीमध्ये कलम ५ अन्वये पोलीस-पाटलांची नियुक्ती करण्याच्या शक्तीचा व तसेच कलम ९ अन्वये पोलीस-पाटलांविरुद्ध किंवा पोलिसांनी [illegible] पात्र असलेल्या ग्राम आस्थापनेच्या सदस्यांविरुद्ध, कारवाई करण्याच्या शक्तीचा समावेश होतो."

विवक्षित उप-विभागीय दंडाधिकाऱ्यांनी केलेल्या पोलीस-पाटलांच्या नियुक्त्यांची आणि त्यांच्याविरुद्ध केलेल्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीची आणि अशा नियुक्त्या व अशी कार्यवाही, इत्यादींच्या संबंधात आयुक्तांनी व राज्य

३. मुंबई ग्राम-पोलीस अधिनियम, १८६७ यान्वये कोणत्याही दंडाधिकाऱ्यास, दंडाधिकाऱ्याच्या ज्या शक्ती प्रत्यायोजित करण्यात आल्याचे अभिप्रेत असेल अशा शक्तींच्या आधारे, त्याने केलेली पोलीस-पाटलाची कोणतीही नियुक्ती किंवा कलम ९ अन्वये असा पाटील किंवा ग्राम कर्मचारी-वर्गातील कोणताही सदस्य याच्याविरुद्ध करण्यात आलेली शिस्तभंगाची कोणतीही कार्यवाही आणि या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही वेळी अशी कोणतीही नियुक्ती किंवा शिस्तभंगाची कार्यवाही यांच्या संबंधातील राज्य शासनाच्या किंवा आयुक्ताच्या पर्यवेक्षण प्राधिकाराचा किंवा नियंत्रणाचा अभिप्रेत वापर करून, राज्य शासनाने किंवा आयुक्ताने दिलेले कोणतेही आदेश, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, मुंबई ग्राम-पोलीस अधिनियम, १८६७ याद्वारे किंवा तदन्वये करण्यात आले आहेत असे मानले जाईल. आणि तदनुसार, कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही असले तरीही, अशी कोणतीही नियुक्ती, शिस्तभंगाची कार्यवाही किंवा आदेश, वैधरीत्या करण्यात आल्याचे मानण्यात येईल ; आणि अशी कोणतीही नियुक्ती, शिस्तभंगाची कार्यवाही किंवा आदेश किंवा मुंबई ग्राम-पोलीस अधिनियम, १८६७ किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही विधी अन्वये किंवा तदनुसार असलेल्या आपल्या शक्तींचा वापर करून पोलीस-पाटलांनी केलेली कोणतीही गोष्ट याबद्दल, कोणत्याही न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा प्राधिकरणापुढे, ती नियुक्ती करण्यास किंवा ती कार्यवाही करण्यास दंडाधिकाऱ्यास कोणतीही शक्ती नव्हती, किंवा राज्य शासनास किंवा आयुक्तांस त्या बाबीमध्ये हस्तक्षेप करण्यास कोणतीही शक्ती नव्हती, किंवा अशा हस्तक्षेपासाठी त्याने (राज्य शासनाने किंवा आयुक्ताने ) त्या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदी अन्वये किंवा तदनुसार त्याच्या (राज्य शासनाच्या) किंवा आयुक्तांच्या शक्तींचा वापर केला नाही किंवा पोलीस-पाटलाची नियुक्ती योग्य रीत्या करण्यात आली नव्हती, केवळ याच कारणावरून किंवा उपरोक्त कारणाच्या

परिणामरूप उद्भवणाऱ्या इतर कोणत्याही कारणास्तव हरकत घेता कामा नये (किंवा हरकत घेतल्यास ती टिकणार नाही.) शासनाने दिलेल्या आदेशांची विधीग्राह्यता.

४. मुंबई ग्राम-पोलीस (उप-विभागीय दंडाधिकाऱ्यांनी केलेल्या नियुक्त्या व शिस्तभंगाची कार्यवाही विधीग्राह्य करणे) अध्यादेश, १९६७ हा याद्वारे रद्द करण्यात येत आहे. सन १९६७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ रद्द करणे.

(यथार्थ अनुवाद)
**बा. ना. पंडित,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.